## वात्रटिका

**दरोडा-बरोरा साहेब, कंटाळा नाही का येत?**




▶▶ पान २ वर


# दैनिक अग्रलेख

RNI NO - MAHMAR/2021/81361

मुख्य संपादक - उमेश सुरेखा मारुती भेरे

लेखणीला जेव्हा भाले फुटतात...

मुंबई-ठाणे-पालघर-नाशिक-रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यांत प्रकाशित होणारे दैनिक वृत्तपत्र

Email - dainikagralekh13@gmail.com

Epaper - https://www.dainikagralekh.com/epaper/

वर्ष ४ थे ● अंक १५७ वा ★ सोमवार, दि. १६ सप्टेंबर २०२४ ● पाने ४ ● किंमत २ रु.




**शासकीय भूखंडावरील सर्वच गृहनिर्माण संस्थांना मालकी हक्कासाठी समान शुल्क**

▶▶ पान ३ वर

# काश्मीरमधील दोडामध्ये ४० वर्षांनी प्रथमच पंतप्रधानांची सभा

**नवी दिल्ली (अग्रलेख वृत्तसेवा) -** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा आज जम्मू काश्मीरची दोडामध्ये सभा होणार आहे. भाजपाचे जम्मू काश्मीरचे निवडणूक प्रमुख जी. किशन रेड्डी म्हणाले की ४० वर्षांनी पंतप्रधानांची सभा दोडा मध्ये होते आहे. याआधी १९८२ मध्ये सभा झाली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जम्मू काश्मीरच्या निवडणुकीसाठीचे भाजपाचे स्टार प्रचारक आहेत. आज दोडा या ठिकाणी असलेल्या मैदानावर सभा घेणार आहेत. जम्मू काश्मीरची निवडणूक जाहीर झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ही पहिली सभा आहे. ३१ ऑगस्टला निवडणूक आयोगाने येथील निवडणुकीची घोषणा केली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी १९ सप्टेंबर रोजी श्रीनगरलाही भेट देणार आहेत. जम्मू-काश्मीरमध्ये तीन टप्प्यांत विधानसभा निवडणूक पार पडणार आहे. १८ सप्टेंबर, २५ सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर अशा तीन टप्प्यांमध्ये ही निवडणूक होईल. पहिल्या टप्प्यात आठ मतदारसंघांसाठी निवडणूक होईल. हे मतदार संघ दोडा येथील तीन जिल्ह्यांमधले आहेत. तर काश्मीर येथील १६ जागांसाठीही याच दिवशी मतदान पार पडेल. भाजपाचे नेते गजय सिंग राणा यांनी दोडा येथून उमेदवारी अर्ज भरला आहे. तर शक्ती राज परिहार हे दोडा पश्चिम मतदारसंघातून निवडणुकीसाठी उभे आहेत. दोडा या ठिकाणी सभा झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे कुरुक्षेत्र या ठिकाणी त्यांची पहिली सभा घेतील कारण पुढच्या



महिन्यात हरियाणा येथे विधानसभा निवडणूक होणार आहे. हरियाणा येथील निवडणूक ५ ऑक्टोबरला पार पडणार आहे. तर हरियाणा आणि जम्मू काश्मीर येथील निवडणुकीचे निकाल ८ ऑक्टोबरला लागणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींची सभा असल्याने दोडा या ठिकाणी कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शुक्रवारी किश्तवर जिल्ह्यात अतिरेक्यांशी दोन हात करताना भारतीय लष्कराचे दोन जवान शहीद झाले तर इतर काही जण जखमी झाले. आज पार पडणाऱ्या सभेत पंतप्रधान काय बोलणार हे पाहणे महत्त्वाचे असणार आहे. २०१९ मध्ये मोदी सरकार दुसऱ्यांदा सत्तेत आल्यानंतर त्यांनी अनुच्छेद ३७० रद्द केलं होतं. त्यानंतर या ठिकाणी म्हणजेच जम्मू आणि काश्मीरमध्ये पहिल्यांदाच निवडणूक पार पडते आहे. त्या पार्श्वभूमीवर विशेष बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सभेत काय बोलणार हे पाहणेही महत्त्वाचे असणार आहे.

## कागदाच्या लगद्यापासून गणेशमूर्ती : वजनदार मूर्तींना पर्याय; गिरगावातील सार्वजनिक मंडळांचा पर्यावरणपूरक उत्सवासाठी पुढाकार





**मुंबई (अग्रलेख वृत्तसेवा) -** केंद्रीय पर्यावरण प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्लास्टर ऑफ पॅरिसवर बंदी घालण्यापूर्वीच गिरगाव आणि आसपासच्या परिसरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी काही वर्षे आधीच शाडूच्या मातीपासून पर्यावरणस्नेही गणेशमूर्ती घडविण्यास सुरुवात केली होती. मात्र, वजनदार गणेशमूर्ती विसर्जनस्थळी नेण्यात येणाऱ्या समस्या लक्षात घेऊन यंदा काही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी कागदाच्या लगद्यापासून पर्यावरणस्नेही गणेशमूर्ती साकारली आहे. त्यात अखिल मुगभाट सार्वजनिक श्री गणेशोत्सव मंडळ आणि खिल खोताची वाडी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा समावेश आहे. मुंबईमधील गिरगाव परिसरातील मुगभाट येथे तब्बल ९३ वर्षांपूर्वी १९३२ मध्ये अखिल मुगभाट सार्वजनिक श्री गणेशोत्सव मंडळाची स्थापना झाली.

▶▶ पान २ वर

## धर्मवीर आनंद दिघे महाराष्ट्र ऑटो रिक्षा व मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळ स्थापन



**दिवा (अग्रलेख वृत्तसेवा) -** राज्यात अनेक वर्षापासून ऑटो-रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालकांसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळ परिवहन विभागांतर्गत स्थापन करण्याबाबत मागणी करण्यात येत होती. महाराष्ट्रातील ऑटो-रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी यांची नोंदणी, बॅज वितरण, निरीक्षण, तपासणी व कर भरणा परिवहन खात्यामार्फत करण्यात येतो. त्यामुळे ऑटो-रिक्षा आणि मीटर्ड टॅक्सी चालकांची अदयावत संपूर्ण माहिती (डेटा) परिवहन विभागाकडे उपलब्ध असते. त्यामुळे परिवहन विभागातंर्गत ऑटो-रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय निर्गमित करण्याची वा शासनाच्या विचाराधीन होती. त्याप्रमाणे शासनाकडून महाराष्ट्र ऑटो-रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

महाराष्ट्र ऑटो-रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाकडून केंद्र शासनामार्फत व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या जीवन विमा व अपंगत्व विमा योजना, आरोग्य विषयक लाभ, कर्तव्यावर असताना दुखापत झाल्यास अर्थसहाय्य योजना (रु.५०,०००/-), पाल्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना, कामगार कौशल्य वृध्दी योजना अशा विविध कल्याणकारी योजनांचा लाभ ऑटोरिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालकांना देण्यात येणार आहेत. हा शासन निर्णय मंत्रिमंडळाच्या दि.१६ मार्च २०२४ रोजी संपन्न बैठकीमध्ये दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आला आहे, असे कल्याणचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांनी कळविले आहे.

# झुगरेवाडी आदिवासी बांधवांचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात जाहीर पक्षप्रवेश

**कर्जत ग्रामीण (अग्रलेख वृत्तसेवा) -** कर्जत तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत ओलमन हद्दीतील झुगरेवाडी येथील आदिवासी बांधवांनी उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात शनिवार दिनांक १४ सप्टेंबर रोजी जाहीर प्रवेश केला आहे. तर हा प्रवेश कर्जत येथील शिवसेनेच्या मध्यवर्ती शिवालय कार्यालयात पार पडला. यावेळी उपजिल्हाप्रमुख उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, तालुका संपर्कप्रमुख भिवसेन बडेकर,




विधानसभा अधिकारी ॲड.संपत हडप, महिला संघटिका करुणा बडेकर, माजी तालुका प्रमुख राजाराम शेळके, माजी पंचायत समिती सभापती पंढरीनाथ राऊत, उपशहरप्रमुख कृष्णा जाधव, आदिवासी संघटना प्रमुख मालू निरगुडा, उपतालुका संघटक रवी ऐनकर, कळंब जिल्हापरिषद विभागप्रमुख लक्ष्मण पोसाटे, जिल्हापरिषद संघटक रमेश भुसाळ, कळंब पंचायत समिती विभाग प्रमुख संतोष बदे, झुगारेवाडी शाखाप्रमुख गणपत पारधी, महिला शाखा संघटिका कविता पारधी, रामदास ठोंबरे, संतोष ऐनकर, विनायक चोखट प्रमुखांसह शिवसेना - युवासेना पदाधिकारी व मोठ्या संख्येने आदिवासी समाज बांधव उपस्थित होते.

कर्जत तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत ओलमण हद्दीतील झुगरेवाडी येथील असंख्य आदिवासी समाज बांधवांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या कार्यप्रणालीवर प्रेरित होत उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत या नेतृत्वावर विश्वास टाकत शिवसेनेत जाहीर पक्ष प्रवेश केला. यावेळी झुगरेवाडी येथील ज्ञानेश्वर पारधी, दाजी पारधी, मंगल झुगरे, रघुनाथ पारधी, भाऊ खडके, आंबो पारधी, पालिबाई झुगरे, शानू पादिर, वैशाली पारधी, नंदा पादिर, काली पारधी, सुमन झुगरे, रंजना झुगरे, लक्ष्मी पारधी, वर्षा झुगरे, मीना झुगरे, रेखा झुगरे, शोभा झुगरे, अर्चना झुगरे, जया पारधी, लीला झुगरे, सुरेखा झुगरे, जनाबाई पारधी, शकुंतला झुगरे,

▶▶ पान २ वर

# संपादकीय

## केजरीवालांची सुटका : हरियाणात 'आप'ला फायदा

केजरीवाल यांना जामीन मिळाल्याची बातमी मिळताच दिल्लीमधील पक्षाच्या कार्यालयाबाहेर कार्यकर्ते आणि समर्थकांनी जोरदार जल्लोष केला. जामिनाचे वृत्त मिळाल्यानंतर नेते कार्यालयात जमले आणि एकमेकांना मिठाई वाटली. हरियाणा विधानसभा निवडणूक पुढील महिन्यात, तर दिल्ली विधानसभा निवडणूक पुढील वर्षाच्या सुरुवातीला होत आहे. अशा वेळी दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचा प्रमुख चेहरा असलेले अरविंद केजरीवाल यांची जामिनावर सुटका झाल्यामुळे, आगामी विधानसभा निवडणुकांमध्ये पक्षाला मोठे बळ मिळेल अशी प्रतिक्रिया पक्षाच्या नेत्यांनी शुक्रवारी व्यक्त केली.

हरियाणामध्ये आपचा एकही आमदार किंवा खासदार नाही. त्या राज्यात ५ ऑक्टोबरला मतदान होणार आहे. विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाची काँग्रेसबरोबर आघाडी होऊ शकली नाही. मूळचे हरियाणाचे असलेल्या केजरीवाल यांच्या सुटकेमुळे आपला सत्ताधारी भाजप व काँग्रेस या दोन्ही पक्षांशी चांगली लढत देता येईल, अशी आशा पक्षाच्या नेत्यांना वाटत आहे. केजरीवाल यांची भाषणशैली आणि विरोधकांवर प्रहार करण्याची पद्धत यामुळे ते मतदारांना आपल्याकडे खेचून घेण्यात यशस्वी होतील. विधानसभा निवडणुकीत आपच्या बाजूला पारडे झुकेल असे पक्षाचे नेते म्हणत आहेत. केजरीवाल यांना जामीन मंजूर झाल्यावर काहीच वेळात पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि राज्यसभेचे खासदार संजय सिंह यांनी हरियाणा आणि दिल्ली या दोन्ही ठिकाणी आप भाजपचा पराभव करेल असा विश्वास व्यक्त केला. त्यांच्या उपस्थितीमुळे आम्हाला बळ मिळेल असे ते म्हणाले. तर आता केजरीवाल हरियाणा विधानसभा निवडणुकीची सूत्रे हाती घेतील अशी आशा खासदार राघव चढ्ढा यांनी बोलून दाखवली. 'पक्षाने गुजरात आणि दिल्लीमधील निवडणुका त्यांच्या नेतृत्वात लढवल्या व हरियाणामधील निवडणूकही त्यांच्या नेतृत्वाखाली लढवू. मला आशा आहे की, ते तिहारमधून सुटका झाल्यावर लगेच निवडणुकीची सूत्रे हाती घेतील, केजरीवाल हे पक्षाचा सर्वात मोठा चेहरा आहेत. त्यामुळेच त्यांना तुरुंगात टाकण्यात आले होते का असा प्रश्न आपच्या एका वरिष्ठ पदाधिकाऱ्याने विचारला. आप राष्ट्रीय पक्ष झाल्यानंतर विविध प्रकरणांमध्ये आमच्या नेत्यांना लक्ष्य करण्यात आले. आमचा पक्ष राष्ट्रीय पातळीवर वाढू नये याच कारणासाठी केजरीवाल आणि मनिष सिसोदिया यांना तुरुंगात टाकण्यात आले, असा आरोप त्यांनी केला.

सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर करताना केजरीवाल यांना आरसा दाखवला आहे अशी टीका भाजपने केली. तसेच त्यांनी तातडीने मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणीही पक्षाने केली. पक्षाच्या मुख्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते गौरव भाटिया यांनी केजरीवाल यांचा उल्लेख कट्टर बेईमान असा केला. तर, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने भाजपचा खोटेपणा उघड पडला आहे, अशी टीका आपच्या वतीने करण्यात आली.

सीबीआयने प्रामाणिक आणि पारदर्शी असले पाहिजे. अटकेची कारवाई पक्षपाती नाही याची खात्री लोकांना व्हावी यासाठी सर्व प्रयत्न सीबीआयने करणे अपेक्षित असते. एखाद्या कारवाईबाबत लोकांचा दृष्टिकोन काय आहे हेही महत्त्वाचे ठरते. म्हणूनच सीबीआय म्हणजे पिंजऱ्यातील पोपट ही लोकांच्या मनातील धारणा काढून टाकण्यासाठी सीबीआयने जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत, असे त्यांनी सुनावले. सीबीआय म्हणजे पिंजऱ्यातील पोपट असल्याची टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने ११ वर्षांपूर्वी केली होती. कोळसाकांड प्रकरणात 'सीबीआय'च्या अहवालामध्ये तत्कालीन केंद्र सरकारने हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला होता.

## कांद्याचे वाढते दर रोखण्यासाठी सरकारचे प्रयत्न; कमी दरात कांदा विक्री सुरु, मुंबईसह दिल्लीत दरात घसरण

मुंबई (अग्रलेख वृत्तसेवा) - कांदा उत्पादक शेतकऱ्यांना चांगले दिवस आले आहेत. कारण कांद्याच्या दारत वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. ज्या शेतकऱ्यांचे सध्या विक्रीसाठी कांदे आहेत, त्यांना मोठा फायदा मिळत आहे. दरम्यान, कांद्याचे दर जास्त वाढू नये म्हणून सरकार प्रयत्न देखील करत आहे. देशातील अनेक महत्वाच्या शहरात सरकारकडून कमी दरात कांद्याची विक्री सुरु आहे. मुंबईसह, दिल्ली, चेन्नई, कोलकाता, पटणा या शहरात सरकारकडून ३५ रुपये किलो दरानं कांद्याची विक्री सुरु आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी कांद्याच्या दरात थोडीशी घसरण झाली आहे.

नाफेडच्या वतीने देशातील महत्वाच्या शहरात ५ सप्टेंबरपासून कमी दरात म्हणजे ३५ रुपये किलो दरानं कांद्याची विक्री सुरु आहे. यामुळे ग्राहकांना कमी दरात कांदा उपलब्ध होत आहे. मात्र, याचा परिणाम अनेक ठिकाणी कांद्याच्या दरावर झाला आहे.

कमी दरात कांद्याची विक्री केल्याने दिल्लीत ६० रुपयावरुन कांद्याचे दर हे ५५ रुपयांवर खाली आले आहेत. तर दुसरीकडे मुंबईत ६१ रुपयावरुन कांद्याचे दर हे ५६ रुपयांवर कमी आले आहेत. तर चेन्नईत कांद्याचे दर ६५ रुपयावरुन ५८ रुपये किलोवर आले आहेत.

दरम्यान, सध्या दिल्लीत २ ठिकाणी सरकारच्या वतीन २५ रुपये किलो दरानं कांद्याची विक्री सुरु आहे. तर मुंबई ४५ ठिकाणी कमी दरात कांद्याची विक्री सुरु आहे. तसेच चेन्नई १९ ठिकाणी कमी दरात कांद्याची विक्री सुरु आहे. येत्या काही दिवसांत हैदराबाद, बंगळुरू आणि कोलकाता तर या महिन्याच्या अखेरीस सर्व राज्यांच्या राजधानींमध्ये कमी दरात कांद्याची विक्री केली जाणार आहे.

### झुगरेवाडी आदिवासी बांधवांचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात जाहीर पक्षप्रवेश

(पान १ वरुन) सुशीला झुगरे, ममता झुगरे, प्रतीक्षा पारधी, मनीषा झुगरे, वंदना केवारी, मनीषा झुगरे, कुसुम पारधी या अदिवासी बांधवांनी प्रवेश केला असून या पक्ष प्रवेशाने कर्जत तालुक्यात दिवसेंदिवस शिवसेना पक्षाची पक्ष बांधणी मजबूत होतांना पाहायला मिळत आहे. तर सर्व आदिवासी समाज बांधवांचे उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत यांनी शिवसेना पक्षात स्वागत करीत पुढील काळात आपल्याला पक्षाच्या वतीने ताकद देत आपले प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध राहू. तसेच आपल्या कोणत्याही समस्या असल्यास त्या आमच्या समोर मांडाव्यात, जेणेकरून त्या समस्या तात्काळ सोडवण्यात येतील, असे आश्वासन उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत यांनी दिले.

### कागदाच्या लगद्यापासून गणेशमूर्ती : वजनदार मूर्तींना पर्याय

(पान १ वरुन) पारतंर्त्यकाळात सुरू झालेल्या या गणेशोत्सवात सांस्कृती, प्रबोधनपर कार्यक्रमांवर भर देण्यात येत होता. भारताला स्वातंर्त्य मिळाले आणि कालौघात गणेशोत्सावाचे स्वरुप बदलेत गेले. काळानुरुप या मंडळाच्या कार्यक्रमांची रुपरेषा बदलत गेली. मंडळातील काही तरुणांनी १९८१ मध्ये 'भारतीय संस्कृती आणि तिचा विस्तार' या संकल्पनेवर गणेशोत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतला. मुंबईकरांना देश-विदेशातील गणेशमूर्तीचे दर्शन घडविण्याचा संकल्प मंडळाने सोडला. मंडळाने १९८१ पासून २००२ पर्यंतच्या काळात दरवर्षी विदेशातील, तसेच महाराष्ट्राच्या अन्य भागातील प्रसिद्ध गणेशमूर्ती साकारली. चिन, जपान, कम्बोडिया, श्रीलंका, भूतान आदी देशांमधील, तसेच महाराष्ट्रातील हेदवी, वाई येथील प्रसिद्ध गणपतीची २० - २१ फूट उंच मूर्ती साकारली होती. देश-विदेशातील गणेशमूर्तीचे दर्शन घडविणारे हे गणेशोत्सव मंडळ अल्पावधीतच मुंबईकरांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू बनले. मात्र २००८ मध्ये उंच गणेशमूर्ती विसर्जनासाठी गिरगाव चौपाटीवर नेण्यात आली. मात्र गिरगाव चौपाटीवर पोहोचल्यानंतर अचानक ट्रॉलीचे चाक निखळले आणि उंच गणेशमूर्ती कोसळली. मूर्तीखाली दोन कार्यकर्ते चिरडले गेले. गंभीर जखमी झालेल्या दोन्ही कार्यकर्त्यांवर अनेक शस्त्रक्रिया कराव्या लागल्या होत्या. त्यानंतर मंडळाने कागदाच्या लगद्यापासून पाच अश्व जोडलेल्या रथावरील १७ फूट उंच सूर्यनारायण अवतारातील गणेशमूर्ती साकारण्याचा निर्णय घेतला. प्रसिद्ध मूर्तिकार अविनाश पाटकर मंडळाच्या मदतीला धावून आले.

## वात्रटिका

### दरोडा-बरोरा साहेब, कंटाळा नाही का येत?



दरोडा-बरोरा साहेब, बस करा आता
कंटाळा नाही का येत तुम्हाला?
४५ वर्ष सत्ताच भोगली ना
काय दिलं तुम्ही आम्हाला?

राजकारण तुमचं बेचव झालं
मुंबईचा उंबरठा कुजतच ठेवला
विकासाचे व्हिजनच नाही कधी दिसलं
आमदारकीचा मुकुट वांझोटाच ठेवला

किती करायच्या अपेक्षा आम्ही
आमच्या मतांचा वापरच केला
आश्वासनांनी भूल थापाच दिल्या
जनतेच्या भावनांचा खेळच केला

तुम्हाला माहित आहे
आपल्याशिवाय पर्यायच नाही
दरोडा-बरोरा घराणे सोडून
वांझोट्या विकासाला उपायच नाही

समस्या इथं हजार
मूलभूत समस्याही सुटल्या नाही
भविष्याच्या बढाया बंद करा
वर्तमानात विकासाला अंकुर फुटलाच नाही

तिसरा पर्याय सगळ्यांना हवाय
घरी बसून आमदार होता येत नाही
आता ढुंगणाला जरी बाशिंग बांधा
दरोडा-बरोरा शिवाय पर्यायच नाही

आता आम्ही कंटाळलो
तुम्हाला कंटाळा येतच नाही?
किती वर्षे अदाला-बदली कराल?
तुमच्या आमदारकीच्या मुकुटात आता तेजच नाही

**- उमेश सुरेखा मारुती भेरे**
(संपादक, अग्रलेख)

Owner, Printer, Publisher and Editor UMESH MARUTI BHERE, AT POST DHASAI, TAL-SHAHAPUR, DIST-THANE, MAHARASHTRA. 421601, Printed at UDDESH VIKAS OFFSET PRINTING PRESS, LOKMANYA TILAK NAGAR, SECTION-20, KHETI AREA, ULHASNAGAR-421003. DIST-THANE, MAHARASHTRA. Published form UMESH MARUTI BHERE, AT POST DHASAI, TAL- SHAHAPUR, DIST-THANE, MAHARASHTRA. 421601, MOB. 8007101060, Editor : UMESH MARUTI BHERE, Editor do not necessarily agree with articles or news published in this newspaper, RNI NO - MAHMAR/2021/81361
Head Office Add.- Agralekh office, Sai Plaza, A wing, apartment no. A-3, 2nd floor, Gramin House No. 665, Gotheghar, Shahapur. 421601.

# शासकीय भूखंडावरील सर्वच गृहनिर्माण संस्थांना मालकी हक्कासाठी समान शुल्क

**मुंबई** (अग्रलेख वृत्तसेवा) - शासकीय भूखंडावरील सर्वच गृहनिर्माण संस्थांना मालकी हक्क (भोगवटादार दोन मधून धारणाधिकार एकमध्ये रुपांतर) बहाल करण्यासाठी आता यापुढे समान शुल्क आकारले जाणार आहे. याआधी वैयक्तिक वा संस्थेला वितरीत केलेल्या भूखंडावरील सहकारी गृहनिर्माण संस्थांना शीघ्रगणकाच्या (रेडीरेकनर) २५ टक्के शुल्क आकारले जात होते. ते आता शासकीय भूखंडावरील सहकारी गृहनिर्माण संस्थेला लागू असलेल्या शीघ्रगणकाच्या दहा टक्के इतकेच शुल्क आकारले जाणार आहे. यामुळे अनेक सहकारी गृहनिर्माण संस्थांना दिलासा मिळाला आहे. राज्यात भाडेपट्टा (लीज) आणि कब्जेहक्काच्या (ऑक्युपन्सी) २२ हजार सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. मुंबईत भाडेपट्ट्याच्या १५०० ते १६०० तर राज्यात १८०० सहकारी गृहनिर्माण संस्था तर कब्जेहक्काच्या मुंबईत १४०० ते १५०० सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. या संस्थांना मालकी हक्क देण्यासाठी राज्य शासनाने अधिसूचना जारी करून वैयक्तिक भूखंडधारकांना शीघ्रगणकाच्या २५ टक्के तर सहकारी गृहनिर्माण संस्थांना शीघ्रगणकाच्या १५ टक्के रक्कम भरुन मालकी हक्क मिळणार होता. त्यात बदल करून फक्त सहकारी गृहनिर्माण संस्थांना खासगी विकासकाने पुनर्विकास केल्यास दहा टक्के तर स्वयंपुनर्विकास केल्यास पाच टक्के रक्कम भरून मालकी हक्क दिला जाणार होता. परंतु वैयक्तिक वा संस्थेला दिलेला भूखंड सहकारी गृहनिर्माण संस्थेला अधिकृत वा अनधिकृतपणे हस्तांतरित झालेला असला



तरी मालकी हक्क देण्यासाठी शीघ्रगणकाच्या २५ टक्केच रक्कम आकारली जात होती. याबाबत शहर जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाकडे पत्र पाठवून विचारणा केली होती. याबाबत महसूल विभागाने स्पष्टीकरण दिले असून अशा भूखंडावरील सहकारी गृहनिर्माण संस्थांकडूनही शीघ्रगणकाच्या दहा टक्के रक्कम आकारण्यास अनुमती दिली आहे. स्वयंपुनर्विकास करणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना पाच टक्के रक्कम आकारली जाणार आहे. शासकीय भूखंडावरील सहकारी गृहनिर्माण संस्थांना मालकी हक्क देण्याबाबत दिलेली मुदत ३० सप्टेंबर रोजी संपुष्टात येत आहे. शासनाने आता याबाबत प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ३० ऑक्टोबरपर्यंतची मुदत दिली आहे. त्यात आणखी काही महिने वाढवून मिळतील.

परंतु सहकारी गृहनिर्माण संस्थांना या कमी कालावधीत मोठी रक्कम भरणे शक्य नाही. अशावेळी ही मुदत तीन वर्षांपर्यंत वाढविण्यात यावी, अशी मागणी शासकीय भूखंड वितरीत झालेल्या संस्थांच्या महासंघाचे अध्यक्ष सलील रमेशचंद्र यांनी केली आहे.

## जितेंद्र आव्हाडांविरोधात गुन्हा नोंदवण्याच्या मागणीचा पुनर्विचार करा; उच्च न्यायालयाचे ठाणे न्यायदंडाधिकाऱ्यांना आदेश

**मुंबई** (अग्रलेख वृत्तसेवा) - सहा वर्षांपूर्वी राज्याच्या दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) नालासोपारा येथून हस्तगत केलेला स्फोटकांचा साठा हा राज्यातील मराठा नेत्याच्या घातपातासाठी होता, असे वक्तव्य शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी केले होते. या वक्तव्याप्रकरणी आव्हाड यांच्याविरोधात गुन्हा नोंदविण्याची मागणी करणाऱ्या अर्जाचा पुनर्विचार करा, असे आदेश उच्च न्यायालयाने ठाणे जिल्हा न्यायदंडाधिकाऱ्यांना दिले आहेत. हिंदू कृती दलाचे नेते आणि वकील कुश खंडेलवाल यांनी ठाणे न्यायदंडाधिकाऱ्यांच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. तसेच, वादग्रस्त वक्तव्य करून दोन गटांमध्ये सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी आव्हाड यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्याची मागणी केली होती. न्यायमूर्ती सारंग कोतवाल यांच्या खंडपीठाने खंडेलवाल यांच्या मागणीचा पुनर्विचार करण्याचे आदेश ठाणे महानगरदंडाधिकाऱ्यांना दिले.



एटीएसने २०१८ मध्ये नालासोपारा येथून गोरक्षक वैभव राऊत याला अटक केली होती. तसेच, नालासोपारा येथील त्याच्या घरातून स्फोटकेही हस्तगत केली होती. हिंदूराष्ट्र निर्माण करण्यासाठी आणि देशाचे सार्वभौमत्व आणि अखंडता धोक्यात आणण्यासाठी दहशतवादी हल्ल्याचा कट रचल्याच्या आरोपांतर्गत वैभव याच्यासह इतर आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला.

परंतु, तपास प्रगती पथावर असताना या स्फोटकांचा एका मराठा नेत्याच्या घातपातासाठी वापर करण्यात येणार होता, असे वक्तव्य आव्हाड यांनी केले. त्यांच्या या वक्तव्यानंतर खंडेलवाल यांनी पोलिसांकडे तक्रार करून दोन गटांत तेढ निर्माण केल्याप्रकरणी आव्हाड यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. पोलिसांनी त्यास नकार दिल्याने खंडेलवाल यांनी ठाणे न्यायदंडाधिकाऱ्यांकडे दाद मागितली. परंतु, हा मुद्दा आपल्या अधिकार क्षेत्राबाहेरील असल्याचे नमूद करून ठाणे न्यायदंडाधिकाऱ्यांनी खंडेलवाल यांची मागणी फेटाळली. त्यामुळे, त्याविरोधात खंडेलवाल यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

## बांगलादेशातील राजकीय अस्थिरतेचा नगरला फटका; तब्बल १८० कोटींची दुधाची भुकटी पडून

**अहमदनगर** (अग्रलेख वृत्तसेवा) - दूध उत्पादनात अग्रेसर असलेल्या अहमदनगर जिल्ह्यात दूध भुकटी निर्मिती करणारे ८ कारखाने आहेत. बांगलादेशातील राजकीय अस्थिरतेचा परिणाम या दूध भुकटी निर्मिती करणाऱ्या उद्योगांवरही झाल्याचे दिसून येत आहे. दोन महिन्यापासून जिल्ह्यात १८० कोटी रुपयांची ९ हजार मॅट्रिक टन दूध भुकटी या कारखान्यांत पडून आहे.

भुकटी निर्मिती करणाऱ्या कारखान्यामध्ये एक किलो दूध बुकटी निर्मितीसाठी २४० रुपये खर्च येतो. प्रत्यक्षात मात्र सध्या किलोमागे २०५ रुपये भाव मिळत असल्याने दूध भुकटी निर्मिती करणारे उद्योग अडचणीत आले आहेत. भारताच्या तुलनेत न्यूझीलंड या देशातील दूध भुकटी उच्च दर्जाची आणि कमी दराने मिळत असल्यामुळे सध्या आंतरराष्ट्रीय बाजारातून या देशातील भुकटीला सर्वाधिक मागणी आहे.

दुबई, शारदा, कुवेत सौदी अरब यासह बांगलादेश आणि अन्य देशात भारतातून दूध भुकटी, बटर आणि दुधापासून तयार केलेल्या अन्नपदार्थांची




निर्यात केली जाते. बांगलादेशात गेल्या काही दिवसापासून राजकीय अस्थिरता निर्माण झाली आहे. त्याचा फटका दुधापासून निर्मित केलेल्या अन्नपदार्थांनाही बसला आहे. राजकीय अस्थिरतेमुळे दीड महिन्यापासून ९ हजार टन दुधाच्या भुकटीची निर्यात थांबली आहे.

दूध निर्मिती करणाऱ्या शेतकऱ्यांना थेट दूध भुकटी निर्यात होत नसल्याने त्याची आर्थिक झळ बसणार आहे. बांगलादेशात भारत कांदा, टोमॅटो, डाळिंब मोठ्या प्रमाणात निर्यात होतात त्या उत्पादक देखील या राजकीय अस्थिरतेचा फटका सहन करावा लागत आहे. त्यामुळे राज्य सरकारने ३२ रुपये जाहीर केलेला दर दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिला पाहिजे, अशी मागणी शेतकरी नेते अनिल घनवट यांनी केली आहे.

# बोगस सैन्यभरतीचा पर्दाफाश; कोट्यवधींची फसवणूक

**अहमदनगर** (अग्रलेख वृत्तसेवा) - सध्या पोलीस भरती आणि सैन्य भरतासाठी तरुणाई जिवाचं रान करुन प्रयत्न करताना पाहायला मिळत आहे. सैन्य भरती निघाली की शक्य तिथं जाऊन शारिरीक चाचणी दिली जाते. तर, पोलीस भरतीसाठीही तरुणांनी असलेल्या स्पर्धा आपल्यासमोर आहे. विशेष म्हणजे या भरतीसाठी तरुणांनाकडून अगोदर विविध क्लासेस किंवा स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्रांच्या माध्यमातून स्वत:ची तयारी केली जात असते. मात्र, बनावट प्रशिक्षण केंद्रांच्या माध्यमातून सैन्य भरतीची तयारी करणाऱ्या शेकडो युवकांची फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. त्यामध्ये, अहमदनगर जिल्ह्यातील १० ते १२ युवकांसह महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, उत्तर प्रदेश, बिहार,पंजाब, हरियाणा आणि नवी दिल्ली येथील शेकडो युवकांना लष्करात भरतीचे आमिष दाखवून फसविणाऱ्या रॅकेटचा अहमदनगर भिंगार पोलीस आणि दक्षिण कमान मिलीटरी इंटेलिजन्स पुणे यांनी कारवाई करत भांडाफोड केला आहे.





अहमदनगर पोलिसांनी बनावट सैन्य भरतीप्रकरणात सत्यजित भरत कांबळे या आरोपीला श्रीरामपूर तालुक्यातून अटक केली असून त्याच्या साथीदाराचा शोध सुरू आहे. मी आणि माझे साथीदार लष्करात तसेच मिलिटरी इंजीनियरिंग सर्व्हिसेस येथे अधिकारी असून मी लष्करात तुमची भरती करून देतो, असे सांगत आरोपी सत्यजित कांबळे आणि त्याचे साथीदार अहमदनगर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्र आणि इतर राज्यातील बेरोजगार सुशिक्षित तरुणांकडून प्रत्येकी ७ ते ८ लाख रुपये घ्यायचे. त्यानंतर, बनावट नियुक्ती पत्र आणि बनावट ओळखपत्र संबंधित तरुणांना दिले जायचे. एवढेच नव्हे तर कांबळे आणि त्याच्या साथीदारांनी महाराष्ट्राबाहेर ट्रेनिंग कॅम्पदेखील उभारले होते.

महाराष्ट्राबाहेर सैन्य भरतीसाठी उभारण्यात आलेल्या बोगस ट्रेनिंग कॅम्पमध्ये तरुणांना बोलावून त्यांना तीन ते चार दिवसाची ट्रेनींग देखील दिली जात होती. आरोपी कांबळे आणि त्याच्या साथीदाराने फक्त महाराष्ट्राच्या तरुणांसोबतच नव्हे तर कर्नाटक, तेलंगणा, उत्तर प्रदेश, बिहार,पंजाब, हरियाणा आणि नवी दिल्ली येथील शेकडो तरुणांसोबत ही फसवणूक केली आहे. आरोपींनी अशा तरुणांना कोट्यावधी रुपयांना गंडा घातल्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे. दरम्यान लष्कर भरती फसवणूकी संदर्भात नाशिक येथे राहणाऱ्या भगवान घुगे यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी अहमदनगर येथील लष्कर हद्दीत असलेल्या भिंगार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी याबाबत मिलिटरी इंटेलिजन्स पुणे यांना याबाबत माहिती दिली होती. त्यानुसार पोलीस आणि मिलीटरी इंटेलिजन्स यांनी आरोपी सत्यजित कांबळे याचा शोध घेतला. मात्र आरोपी कांबळे हा दिल्लीत असल्याची पोलिसांनी माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी आणि आर्मी अधिकाऱ्यांनी थेट दिल्ली गाठली. पण, पोलीस पाठलाग करत असल्याचा सुगावा तेथे त्याला लागला आणि तो दिल्लीवरून महाराष्ट्रात परतला.

दरम्यान पोलिसांनीही अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यातून आरोपीला अटक केली आहे. लष्कर भरती प्रकरणातील रॅकेटचा मुख्य सूत्रधार सत्यजित कांबळे याला पोलिसांनी अटक केली असून त्याने अहमदनगर जिल्ह्यातील दहा ते बारा युवकांना लाखों रुपयांना गंडा घातला असून इतर राज्यातील शेकडो तरुणांना कोट्यवधी रुपयांना गंडा घातल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. तसेच या रॅकेटमध्ये सत्यजित कांबळे एकटा आरोपी नसून ही टोळी आहे आणि या टोळीत महिला देखील सहभागी असल्याची शक्यता असल्याने तपास सुरू असून यात मोठी रक्कम निष्पन्न होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

# ग्लोबल कोऑपरेटिव कॉनफरन्स २०२४ भारतात

इफकोच्या पुढाकाराने जागतिक सहकारी चळवळीची प्रमुख संस्था असलेल्या आंतरराष्ट्रीय सहकारी आघाडीच्या (आयसीए) १३० वर्षांच्या इतिहासात प्रथमच, आयसीए सर्वसाधारण सभा आणि ग्लोबल कोऑपरेटिव कॉनफरन्सचे आयोजन भारत करणार आहे. दिनांक २८ जून २०२३ रोजी ब्रुसेल्स येथे झालेल्या आयसीए मंडळाच्या बैठकीत इफकोने आयसीए सर्वसाधारण सभा आणि जागतिक परिषद भारतात आयोजित करण्याचा प्रस्ताव ठेवला होता, ज्याला मंडळाच्या सदस्यांनी सहमती दर्शवली होती. युनायटेड नेशन्स ऑर्गनायझेशनच्या (यूएनओ) मुख्यालयात झालेल्या बैठकीत असा निर्णय घेण्यात आला की भारतातील ग्लोबल कोऑपरेटिव कॉनफरन्स संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय सहकारी वर्ष-२०२५ चा अधिकृत शुभारंभ देखील करेल. भारत सरकारचे सहकार मंत्री अमित शहा २५ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी ३ वाजता त्यांच्या सन्माननीय उपस्थितीने या कार्यक्रमाला उपस्थित राहतील. ग्लोबल कोऑपरेटिव कॉनफरन्सच्या उद्घाटन सत्राचे ते प्रमुख पाहुणे म्हणून अध्यक्षपद भूषवतील. या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय सहकारी वर्ष-२०२५ च्या निमित्ताने टपाल तिकिट देखील प्रकाशित केले जाईल. धोरण आणि उद्योजक परिसंस्था सक्षम करणे, सर्वांसाठी समृद्धी निर्माण करण्यासाठी उद्देशपूर्ण नेतृत्व वाढवणे, सहकार्याच्या ओळखीची पुन्हा पुष्टी करणे. ही या कॉनफरन्सची उद्दिष्ट आहेत.

# श्रीराम फायनान्सचा ब्रँड ॲम्बेसेडर राहुल द्रविड



श्रीराम समूहाची प्रमुख कंपनी, श्रीराम फायनान्स लिमिटेडने, भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार आणि मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांना कंपनीचे ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती केल्याची घोषणा केली आहे. विश्वास आणि विश्वासार्हतेसाठी प्रसिद्ध असलेल्या या दोन प्रतिष्ठित घटकांना या भागीदारीने एकत्र आणलेआहे. ही सामायिक मूल्यांवर बांधलेली भागीदारी आहे. राहुल द्रविड, क्रिकेटच्या मैदानावरील त्याच्या अतूट समर्पणासाठी ओळखले जातात जे श्रीराम फायनान्सने कायम ठेवलेल्या आपल्या मूलभूत मूल्यांचे प्रतीक आहे. राहुल ज्याप्रमाणे भारतीय क्रिकेटचा कणा मानले जायचे त्याचप्रमाणे श्रीराम फायनान्स देशभरातील असंख्य व्यक्ती आणि व्यवसायांच्या आर्थिक प्रवासात एक स्थिर भागीदार आहे.

उमेश रेवणकर, कार्यकारी उपाध्यक्ष, श्रीराम फायनान्स या भागीदारी बद्दल बोलताना म्हणाले, 'ग्राहकांना आपल्या वाटचालीत यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेलीआर्थिक साधने आणि पाठबळ देत नेहमी सक्षम करणे, हे श्रीराम फायनान्सचे ध्येय आहे. तरुण प्रतिभेचे संगोपन करण्याबाबत दृढ वचन बध्दतेसाठी ख्यात असलेले राहुल द्रविड यांची प्रतिमा विकासआणि यशासाठीआणखी भरारी घेण्याच्या आमच्या ध्येयाशी पूर्णपणे एकरुप होते. आमचे ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून त्यांना नियुक्त करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.'

# इवेक्सिया लाईफ केअर बोर्डाचा १६ सप्टेंबर रोजी निधी उभारणीचा विचार

इवेक्शिया लाईफ केअर लिमिटेड. (BSE: 524444), रसायने, मध्यवर्ती उत्पादन, कृषी उत्पादने आणि ग्राहकोपयोगी वस्तूंच्या इतर विविध उत्पादनांच्या व्यापारात गुंतलेली, कंपनी असून कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक सोमवार, १६ सप्टेंबर २०२४ रोजी होणार आहे. या बैठकीत कंपनी परिवर्तनीय इक्विटी वॉरंट जारी करून आणि/किंवा इक्विटी शेअर्स प्राधान्याच्या आधारावर अशा मंजूरींच्या अधीन राहून निधी उभारणे, जसे की सदस्यांच्या मंजूरी आणि इतर वैधानिक / नियामक मंजूरी संधर्भात विचार करणार आहे.

Evexia LIFECARE LIMITED

अलीकडेच, कंपनीने जाहीर केले की त्यांच्या सदस्यांनी ९ जुलै २०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत परकीय चलन परिवर्तनीय बाँड्सच्या इश्यूला मान्यता दिली आहे. बोर्डाने २५ बाँड्सचे इक्विटी शेअर्समध्ये रूपांतर करण्यास मान्यता दिली आहे. अलीकडेच, संचालक मंडळाने १७ जून २०२४ रोजी झालेल्या बैठकीत इएँ च्या इश्यूच्या अटी व शर्तीनुसार ७५ बाँड्सचे इक्विटी शेअर्समध्ये रूपांतर करण्यावर विचार केला आणि मान्यता दिली.

यापूर्वी, इवेकशिया लाईफ केअर लिमिटेड कंपनीने. घोषणा केली की त्यांनी ठएवेक्सिया लाईफ केअर आफ्रिका लिमिटेड (CIN: 14497377) नावाची एक उपकंपनी समाविष्ट केली आहे जी इंग्लंड आणि वेल्ससाठी कंपनीच्या रजिस्ट्रारकडे नोंदणीकृत आहे. इंग्लंड आणि वेल्सच्या रजिस्ट्रार ऑफ कंपनीजने जारी केले आहे. इव्हेक्सिया लाइफकेअरने आफ्रिकेत पॅथॉलॉजी लॅबची स्थापना करण्यासाठी नवीन उपकंपनी स्थापन केली.

# एसबीआय बॅलन्स्ड ॲड्व्हांटेज फंडाचे तीन वर्षे पूर्ण

ऑगस्ट २०२१ मध्ये शुभारंभ करण्यात आलेल्या आणि नवीन फंडाच्या ऑफरवेळी १४,६०० कोटी रुपयांचे सर्वोच्च निधी संकलन करणाऱ्या एसबीआय बॅलन्स्ड ॲड्व्हांटेज फंडाने तीन वर्ष पूर्ण केले आहेत. या फंड योजनेने सुरुवातीपासून ( ३१ ऑगस्ट २०२१) १४.११ टक्के परतावा मिळवून दिला आहे. तर या योजनेसाठी आधारभूत निर्देशांक असलेल्या फिफ्टी फिफ्टी हायब्रीड कॉम्पोझिट डेट ५०:५० निर्देशांकाने १०.५८ टक्के तर बीएसई सेन्सेक्सने १४.१५ टक्के परतावा दिला आहे. ही योजना सुरू झाली तेव्हा एखाद्याने एक लाख रुपयांची एकरकमी गुंतवणूक केली असती, तर त्या गुंतवणूकीचे मूल्य ३१ ऑगस्ट २०२४ रोजी १,४८,६३० रुपये असते. समभाग आणि रोखे गुंतवणुकीच्या लवचिक संयोगातून दीर्घकालीन भांडवलवृध्दी आणि उत्पन्न प्रदान करणे, हे या योजनेचे गुंतवणूक उद्दिष्ट आहे. तथापि, योजनेचे गुंतवणुकीचे उद्दिष्ट पूर्ण होईलच, याची खात्री देता येत नाही. ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत, या योजनेने समभागांत ३०.३७ टक्के रक्कम तर शिल्लक रक्कम रोख्यांमध्ये गुंतवलेली आहे.

संकलन - संयोजन - सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
इमेल -subodh.ranshevre@rediffmail.com

# मर्क्युरी ईव्हीटेक मंडळाची INR ४८० कोटीपर्यंत निधी उभारणीस मान्यता




मर्क्युरी ईव्ही टेक लि. (BSE: 531357), EVs च्या व्यवसायात गुंतलेल्या एक आघाडीच्या खेळाडूने जाहीर केले आहे की त्यांच्या मंडळाने आवश्यक असलेल्या मंजूरींच्या अधीन प्रेफरेंशिअल आधारावर परिवर्तनीय इक्विटी वॉरंट आणि/किंवा इक्विटी शेअर्स जारी करून निधी उभारण्यास मान्यता दिली आहे. कंपनी रु. INR 480 पर्यंत उभारणार आहे. हा निधी इक्विटी शेअर्सच्या प्राधान्य इश्यूद्वारे ११८.०६ कोटी, आणि रु. पर्यंत. आणि परिवर्तनीय वॉरंटच्या प्राधान्य इश्यूद्वारे. ३६२.२५ कोटी इतका असेल. प्रस्तावित वाटप हे FPIs Forbes EMF, AG डायनॅमिक फंड्स लि. इतर श्रेणीतील गुंतवणूकदारांमध्ये.केले जाणार आहे.

मर्क्युरी ईव्ही टेक लि. (BSE: 531357) ही एक अग्रगण्य EV कंपनी आहे ज्याची संपूर्ण EV Eco प्रणालीमध्ये उपस्थिती आहे. यात अत्याधुनिक २०-एकर ईव्ही तंत्रज्ञान आणि उत्पादन सुविधा आहे. कंपनीकडे 'थंडरबोल्ट' या ब्रँड अंतर्गत उत्पादनांची विस्तृत श्रेणी आहे. थंडरबोल्ट ब्रँडमध्ये कंपनीचा नवीनतम समावेश म्हणजे तिची ४-चाकी वाहन 'थंडरबोल्ट मुसाक' आहे. नाविन्यपूर्ण आणि प्रगत मेक-इन-इंडिया इलेक्ट्रिक मोबिलिटी सोल्यूशन्ससह जबाबदार आणि हरित वाहतूक प्रवास सुरू ठेवण्याचे कंपनीचे ध्येय आहे. बाजाराला स्वच्छ ऊर्जेच्या पर्यायाकडे नेण्यासाठी देशभरात सर्वसमावेशक सेवा आणि चार्जिंग स्टेशन उपलब्ध करून देण्याची त्याची इच्छा आहे.

गणेशोत्सव निमित्त खास ऑफर
श्री इलेक्ट्रीकल्स
POLYCAB LED

| LED | MRP | SPECIAL OFFER |
|---|---|---|
| 5 wt. | ~~125~~ | 51 |
| 7 wt. | ~~130~~ | 53 |
| 9 wt. | ~~130~~ | 55 |
| 12 wt. | ~~195~~ | 110 |
| 15 wt. | ~~260~~ | 155 |
| 18 wt. | ~~280~~ | 195 |
| 23 wt. | ~~440~~ | 295 |
| Charging Bulb | ~~480~~ | 295 |
| 20 wt. Led Tubelight | ~~280~~ | 110 |
| Decorative Lighting | ~~250~~ | 99 |

ऑफर फक्त मर्यादीत स्टॉकपर्यंत
०१ वर्षाची वॉरंटी
श्री. अमोल अंदाडे (मो. नं. ८८०५४६९१८८)
पत्ता : श्री कृपा बिल्डींग, शहापूर-किन्हवली रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक (सापगांव नाका), सापगांव, ता. शहापूर, जि. ठाणे